## उप विभागीय अधिकारी, पेण यांजकडून

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत.**

### कलम १९ ची अधिसूचना

क्रमांक उविअ पेण/भूसंपादन/गेल एस.व्ही.स्टे./ओढांगी/कलम १९/प्रसिद्धी/२०२५/६३४९.—याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना दिनांक २६ डिसेंबर २०२४ अन्वये कलम ११ ची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेली अधिसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे ; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पेण यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

**गाव ओढांगी, तालुका पेण, जिल्हा रायगड**

| अनुक्रमांक | स.नं.ग.नं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | १९१ | ०.२१.६० |
| | **एकूण क्षेत्र** | **०.२१.६०** |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : पेण तालुक्यातील मौजे ओढांगी, क्षेत्र ०.२१.६० हे. आर. उरण उसर प्रोपेन पाईप लाईनच्या एस. व्ही. स्टेशन (Sectionalizing Valve Station) च्या बांधकामासाठी भूसंपादन करणेकामी प्रयोजन.

**प्रकल्प कार्याचे वर्णन** : पेण तालुक्यातील मौजे ओढांगी, क्षेत्र ०.२१.६० हे. आर. उरण उसर प्रोपन पाईप लाईनच्या एस. व्ही. स्टेशन (Sectionalizing Valve Station) च्या बांधकामासाठी भूसंपादन करणेसाठी आवश्यक आहे.

**समाजाला मिळणारे लाभ** : करांच्या माध्यमातून राज्य सरकारच्या महसुलाची निर्मिती, अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती आणि सामाजिक आर्थिक विकास साध्य करणे.

**अनुसूची-तीन**

| | | |
|---|---|---|
| **बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** | : | निरंक |

**अनुसूची-चार**

| | | |
|---|---|---|
| **सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश** | - | **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग चार-अ, दिनांक १० ऑक्टोबर २०२४ अन्वये भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १० क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे. |

**प्रविण ज्ञानू पवार,**
उप विभागीय अधिकारी, पेण
उप विभाग, पेण.

ठिकाण-पेण,
दिनांक २९ सप्टेंबर २०२५.